# दिवा शहरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करणार- रमाकांत मढवी

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक - ४८

epaper.diwanews.com

www.diwanews.com ♦ सोमवार, ३० जून २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

**युवती सेनेतर्फे आयोजित गुणगौरव सोहळ्यात शहरप्रमुख रमाकांत मढवी यांचे आश्वासन**

(पान ४ वर)

# शिक्षणाचा अजब कारभार...अनधिकृत शाळांविरोधात एकीकडे अधिकृत शाळांचा बंदचा इशारा,तर दुसरीकडे अनधिकृत शाळांचा मेळावा...!

अनधिकृत शाळा बंद होत नाहीत म्हणून अधिकृत शाळांनी बंद पुकारून स्वत:च्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याचा विचार करावा याला काय म्हणावे.

दुसरीकडे अनधिकृत शाळांनी त्यांच्या शासकीय परवानग्या न घेता दिव्यातच मेळावे आयोजित केले तर हा शिक्षणाचा धोरणात्मक प्रश्न सुटणार आहे का ?

## दिव्यात शिक्षणाचा गोंधळ

**सडेतोड**

**सुहास खंडागळे**

स्वत: दिवा शहरात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्यायच्या नाहीत, अनधिकृत शाळांवर कारवाई सुद्धा करायची नाही...आणि दुसरीकडे या शाळांना परवानगी देखील द्यायची नाही हे पालिकेचे धोरण कस चालेल ?

> "ज्या अधिकृत शाळा दिव्यात आहेत त्यांना परवानग्या कशाच्या आधारे मिळाल्या याची माहिती शिक्षण विभागाने सार्वजनिक केली तर अनधिकृत शाळांना परवानगी घेण्यासाठी काय करावे लागेल याची कल्पना येईल...

महापालिकेच्या भोंगळ कारभाराने दिव्यात शिक्षणाचा गोंधळ घातला आहे.महापालिकेने स्वत:च्या शाळा लोकसंख्येच्या प्रमाणात वाढवल्या असत्या तर इथे शैक्षणिक असुविधांचा सामना नागरिकांना करावा लागला नसता ही वस्तुस्थिती आहे.दिव्यात एकीकडे अधिकृत शाळांनी अनधिकृत शाळा बंद व्हाव्यात यासाठी १ जुलै पासून बेमुदत बंद पुकारला आहे. तर दुसरीकडे दिव्यात मान्यता नसलेल्या अनधिकृत शाळांचा मेळावा पार पडला आहे. शिक्षणाचा असा खेळखंडोबा अन्य कोणत्या शहरात सुरू नसेल.दिवा शहरातील ही शैक्षणिक स्थिती चिंतेची आहे.

अनधिकृत शाळा बंद होत नाहीत म्हणून अधिकृत शाळांनी बंद पुकारून स्वत:च्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याचा विचार करावा याला काय म्हणावे.कदाचित हे राज्यातील पहिले उदाहरण असावे.

अनधिकृत शाळांचा विरोध करताना आपल्या शाळा बंद ठेवणे यातून साध्य ते काय होणार ?

खरं तर अधिकृत शाळांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.शाळा बंद ठेऊन आपल्या विद्यार्थ्यांचे हित कसं साधणार हा प्रश्न आहे. दुसरीकडे अनधिकृत शाळांनी त्यांच्या शासकीय परवानग्या न घेता दिव्यातच मेळावे आयोजित केले तर हा शिक्षणाचा धोरणात्मक प्रश्न सुटणार आहे का ?हा ही आमचा प्रश्न आहे.अनधिकृत शाळांना परवानग्या का नाकारल्या जातात याचा शोध त्या त्या संस्था चालकांनी घ्यायला हवा.

ज्या अधिकृत शाळा दिव्यात आहेत त्यांना परवानग्या कशाच्या आधारे मिळाल्या याची माहिती शिक्षण विभागाने सार्वजनिक केली तर अनधिकृत शाळांना परवानगी घेण्यासाठी काय करावे लागेल याची कल्पना येईल. यातून प्रश्न सुटण्याच्या दिशेने वाटचाल होईल.

## महापालिका प्रशासन जबाबदार

**महापालिका** प्रशासनाने अद्याप अनधिकृत शाळांवर कारवाई का नाही केली हा संशोधनाचा विषय आहे. स्वत: दिवा शहरात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्यायच्या नाहीत आणि दुसरीकडे अनधिकृत शाळांवर कारवाई सुद्धा करायची नाही... या शाळांना परवानगी देखील द्यायची नाही हे धोरण कस चालेल ?मुळात शिक्षण व्यवस्थेची जाण नसणारे लोकं या सिस्टीम मध्ये बसले की असे प्रश्न निर्माण होतात. दिव्यात निर्माण झालेली शैक्षणिक अनागोंदी महापालिका शिक्षण विभागाचे पाप आहे.

दरवर्षी शहरात अनधिकृत शाळा वाढत असतानाही त्याकडे डोळेझाक करणारे अधिकारी महापालिका शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा काय राखणार हा आमचा प्रश्न आहे.दिव्यात ६० हुन अधिक अनधिकृत शाळा आहेत. त्यात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इतक्या संख्येने असणाऱ्या विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये सामावून घेणे तांत्रिक दृष्टीने शक्य नाही. खासगी अधिकृत शाळांची फी सामान्य कुटुंबातील विध्यार्थ्यांना परवडत नाही. महापालिका प्रशासनाने दिव्यात शाळांची संख्याही वाढवलेली नाही.अशा स्थितीत येथील विद्यार्थ्यांना न्याय कसा मिळणार हाही प्रश्न आहे. पालिका आयुक्त या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन दिव्यातील शैक्षणिक गोंधळ थांबवायला हवा!

# दिवा रेल्वे स्थानकावर १ जुलैपासून अश्विनी केंद्रे यांचे बेमुदत धरणे आंदोलन

**दिवा:** - मध्य रेल्वे प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात १ जुलै २०२५ पासून दिवा रेल्वे स्थानकाबाहेर बेमुदत धरणे आंदोलनाची घोषणा समाजसेविका सौ.अश्विनी अमोल केंद्रे यांनी केली आहे.

दिवा ते एएश्ऊ लोकल सेवा त्वरित सुरू करावी, सर्व फास्ट लोकल दिवा येथे थांबवाव्यात आणि दिवा-पनवेल लोकल सेवा चालू करावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

त्यांनी याबाबत मध्य रेल्वेचे प्रबंधक यांना निवेदन दिले आहे.या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की,दिवा हे एक महत्त्वाचे जंक्शन असूनही येथे फास्ट लोकल थांबत नाहीत आणि दिवा ते एएश्ऊ लोकल सेवा उपलब्ध नाही, यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. २०१४ पासून शेकडो निष्पाप नागरिकांनी रेल्वे अपघातात आपले प्राण गमावले असून, दररोज किमान एक तरी अपघात घडत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. प्रशासन लोकल फेऱ्या वाढवण्याबाबत आणि दिवा ते एएश्ऊ लोकल सुरू करण्याबाबत उदासीन असल्याचा आरोप अश्विनी केंद्रे यांनी केला आहे. समाजसेवक अमोल धनराज केंद्रे यांनी यापूर्वीही या मागण्यांसाठी अनेक निवेदने दिली आहेत, स्वाक्षरी मोहीम राबवली आहे, मोर्चे काढले आहेत, सात दिवसांचे आमरण उपोषण केले आहे आणि 'ढोल बजाव आंदोलन' देखील केले आहे. मात्र, तरीही रेल्वे प्रशासनाने यावर कोणतीही ठोस भूमिका स्पष्ट केली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ९ जूनसारखे दुर्दैवी अपघात टाळण्यासाठी आणि प्रवाशांचे जीव वाचवण्यासाठी लोकलच्या फेऱ्या वाढवणे



आणि दिवा ते एएश्ऊ लोकल त्वरित सुरू करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सौ. अश्विनी केंद्रे यांनी म्हटले आहे. विद्याविहार, घाटकोपर, डोंबिवली येथून लोकल सेवा सुरू होऊ शकते, तर दिवा जंक्शन असूनही येथून लोकल का सुरू होत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. अपघातात ज्यांचे जीव गेले, त्यांना खरी श्रद्धांजली द्यायची असेल तर या मागण्या त्वरित पूर्ण कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

हे आंदोलन पूर्णपणे लोकशाही मार्गाने आणि शांततामय पद्धतीने केले जाईल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अनधिकृत शाळा व त्या शाळांमधील विद्यार्थी यांचे नुकसान होऊ देणार नाही-रमाकांत मढवी



**दिवा:**-दिव्यातील अनधिकृत शाळा चालकांचा मेळावा आकांक्षा हॉल येथे पार पडला. दिव्यात अनेक शाळांना मान्यता नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य अडचणीत असल्याने या शाळांना लवकरात लवकर मान्यता मिळावी यासाठी आपण पाठपुरावा करत असल्याचे शिवसेना शहर प्रमुख रमाकांत मढवी यांनी यावेळी सांगितले. अनधिकृत शाळा व त्या शाळांमधील विद्यार्थी यांचे नुकसान होऊ देणार नाही असा शब्द यावेळी रमाकांत मढवी यांनी मेळावा आयोजकांना दिला.











हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# वीजदर कपातीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन

## भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड संदीप लेले यांचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रतिपादन

**ठाणे** :- राज्यातील सर्व घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक वीज ग्राहकांसाठीचा वीजदर कमी केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो, असे भारतीय जनता पार्टीचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांनी सांगितले.

राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना यापूर्वीच सिंचनासाठी मोफत वीज मिळत आहे, असेही ते म्हणाले.

त्यांनी सांगितले की, मा. देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या तीन वर्षात राज्याच्या ऊर्जा विभागाची जबाबदारी पार पाडताना ऊर्जा क्षेत्रात मोठे परिवर्तन घडविले. त्यांच्या नेतृत्वात महावितरण या सरकारी वीज वितरण कंपनीने वीज खरेदी करार करताना रिन्युएबल एनर्जीवर भर दिल्यामुळे कंपनीची वीज खरेदी खर्चात फार मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. याचा लाभ वीज ग्राहकांना करून देण्यासाठी महावितरणने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केलेल्या वीजदर याचिकेमध्ये इतिहासात प्रथमच वीजदर कमी करण्यास परवानगी मागितली. या याचिकेवर विद्युत नियामक आयोगाने बुधवारी निर्णय दिला असून घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.

ते म्हणाले की, या पूर्वी दरवर्षी विजेचे दर वाढत होते. या पार्श्वभूमीवर प्रथमच विजेचे दर कमी होणार असून आगामी पाच वर्षे प्रत्येक वर्षी त्यात घट होणार आहे. घरगुती वीज ग्राहकांमध्ये सत्तर टक्के प्रमाण हे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे आहे व त्यांच्यासाठीच्या वीजदरात यावर्षी दहा टक्के घट होणार आहे तर पाच वर्षांच्या अखेरीस त्यांच्यासाठीचा वीजदर २६ टक्के कमी झालेला असेल. शंभर ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांसाठीच्या दरातही कपात होणार आहे.

त्यांनी सांगितले की, मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने आगामी काळात राज्याला किती विजेची गरज पडेल हे ध्यानात घेऊन रिसोर्स ?डेक्वसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज सौर, पवन अशा रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने महावितरणच्या वीज खरेदी खर्चात खूप मोठी बचत होणार आहे. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला.

ते म्हणाले की, भाजपाने निवडणुकीच्या वेळी घरगुती ग्राहकांचे वीजदर कमी करण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाचे पालन झाले आहे. तसेच उद्योगांसाठीच्या वीजदरात कपात केल्यामुळे राज्यात उद्योगांची वाढ होण्यास मदत होईल.

# संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संवेदनशील क्षेत्रात नियमांना हरताळ

## कारवाई न झाल्यास मनसेचा आंदोलनाचा इशारा

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येणाऱ्या येऊर परिसरात रात्री उशिरापर्यंत धिंगाणा सुरु असून, वनविभाग आणि ठाणे महापालिका प्रशासनाच्या वरदहस्ताने हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्स बिनधास्तपणे सुरू असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे.**

**ठाणे** :- संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येणाऱ्या येऊर परिसरात रात्री उशिरापर्यंत धिंगाणा सुरु असून, वनविभाग आणि ठाणे महापालिका प्रशासनाच्या वरदहस्ताने हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्स बिनधास्तपणे सुरू असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे. दरम्यान प्रशासनाने याबाबत तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी मनसेच्या वतीने देण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या २०१६ च्या परिपत्रकानुसार, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात अशा प्रकारच्या व्यवसायांना स्पष्टपणे बंदी घालण्यात आली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमाभागात असलेल्या येऊरमध्ये मात्र या नियमांची सर्रासपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. संध्याकाळी सहा वाजल्यानंतर सामान्य नागरिकांना या परिसरात प्रवेश करण्यास मज्जाव असताना,दुसरीकडे पहाटेपर्यंत हॉटेल्स, रिसॉर्ट्समध्ये होणाऱ्या मोठ्या

**कायदे झोपले, पार्ट्या जाग्या: येऊरमध्ये रात्रीचा धिंगाणा**

प्रमाणात पार्ट्या, मद्यसेवन आणि अन्य अवैध प्रकार सर्रास सुरू असल्याचे महिंद्रकर यांनी सांगितले. या बेकायदेशीर धंद्यांवर वनविभाग किंवा महापालिकेकडून कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इतकेच नव्हे तर, उच्च न्यायालय तसेच राष्ट्रीय हरित लवाद वेळोवेळी पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील नियमांची अंमलबजावणी आणि संवर्धनासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ नुसार अशा क्षेत्रांमध्ये कोणतेही अनधिकृत बांधकाम करणे किंवा व्यावसायिक उपक्रम चालविणे कायद्याचे उल्लंघन ठरते. या घडणाऱ्या घटनांमुळे नागरिक आणि पर्यावरण प्रेमी संघटनांमध्ये संतापाची लाट पसरली असून या अवैध कृत्यांवर कठोर पावले उचलण्याची मागणी केली जात आहे.

परिसरात सुरू असलेल्या अवैध हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्सवर वनविभाग व पालिका प्रशासनाने जर तात्काळ ठोस कारवाई केली नाही, तर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात

**- स्वप्नील महिंद्रकर,**
**ठाणे शहर अध्यक्ष,**
**जनहित व विधी विभाग**

# दिवा शहराच्या स्वतंत्र पोलिस ठाण्यासाठी आमदार राजेश मोरे यांची मुख्यमंत्री कार्यालयाकडे मागणी

**दिवा** : -कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील दिवा शहरात स्वतंत्र पोलिस ठाण्याची गरज अधोरेखित करत आमदार राजेश गोवर्धन मोरे यांनी मुख्यमंत्री सचिवालयाकडे अधिकृतरित्या मागणी केली आहे. दिवा शहरात वाढत्या लोकसंख्येच्या आणि नागरी सुविधांच्या अभावामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्वतंत्र पोलिस ठाणे अत्यावश्यक असल्याचे आमदार मोरे यांनी पत्राद्वारे नमूद केले आहे.

ते पुढे म्हणाले की, सध्या दिवा शहरातील शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या जबाबदारीसाठी मुंब्रा पोलीस ठाण्यावर मोठा ताण येत आहे, परिणामी अनेक नागरिकांना तक्रारी नोंदवण्यासाठी आणि तत्काळ पोलीस मदतीसाठी मोठ्या अडचणीचा सामोरे जावे लागत आहे. तसेच दिव्यातील नागरिकांना पोलिस कामकाजासाठी मुंब्रा पोलिस ठाण्यावर अवलंबून राहावे लागते, त्यामुळे त्वरित प्रतिसाद देणे शक्य होत नाही. शिवाय, दिवा शहरातील वाढती लोकसंख्या, गृहनिर्माण प्रकल्प, दिवा जंक्शन, बुलेट ट्रेन व अन्य सार्वजनिक सुविधा यामु ?ळे येथे पोलिसांची उपस्थिती वाढविणे गरजेचे आहे. तसेच, गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी दिवा शहरात स्वतंत्र पोलीस ठाण्याची नितांत अवश्यकता आहे. मुख्यमंत्री सचिवालयाकडून या मागणीची गांभीर्याने दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## मराठी भाषेच्या संरक्षणासाठी ठाण्यात सर्व पक्षीयांची वज्रमुठ, शासन निर्णयाची होळी

**ठाणे** :- ठाण्यातील जांभळी नाका चौकात इयत्ता पहिली पासून हिंदी सक्ती विरोधात निर्णयाची प्रतीकात्मक आली. याप्रसंगी मराठी आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, रद्द करा रद्द करा, हिंदीची सक्ती कायदा रद्द करा अशा अनेक सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच मराठी भाषेच्या संरक्षणासाठी ठाण्यात सर्व पक्षीयांची वज्रमुठ दिसून आली. शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे, मनसेचे ठाणे शहर अध्यक्ष रवींद्र मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई त्याचबरोबर ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, शिवसेना ठाणे जिल्हा महिला आघाडी रेखा खोपकर, ठाणे जिल्हा महिला कार्याध्यक्ष साबीया मेमन यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांसह ठाणेकर मराठी नागरिकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते

# १ जुलै पासून दिव्यातील शाळा बंद ठेवल्यास संस्था चालकांवर गुन्हे दाखल करा,

## मनसेची पोलीस आयुक्त व पालिका आयुक्तांकडे मागणी

**दिवा:-** दिव्यातील अनधिकृत शाळा बंद होत नाहीत म्हणून अधिकृत शाळा १ जुलैपासून बंद ठेवल्या गेल्या व विद्यार्थ्यांचे नुकसान केले गेले तर अशा संस्था चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करा,अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा सचिव प्रशांत गावडे यांनी केली आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे यांनी याबाबत ठाणे शहर पोलीस आणि ठाणे महानगरपालिका यांना सोशल मीडिया एक्स वर याबाबत पोस्ट करून विनंती केली आहे. या पोस्ट मध्ये त्यांनी म्हटले आहे की, अनधिकृत शाळांवर कारवाई होत नाही म्हणून अधिकृत शाळा बेमुदत बंद हा काय प्रकार आहे ? त्या शाळा बंद झाल्या तर आपल्या शाळेत विद्यार्थी वाढतील यासाठी विद्यार्थ्यांचे नुकसान करायचे ही कसली प्रवृत्ती ? स्वतः:च्या शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान करून कोणते हीच साधले जाणार आहे . नियमबाह्यपणे शाळा बंद ठेवण्प्रया या अशा संस्था चालकाविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करा अशी मागणीच प्रशांत गावडे यांनी केली आहे. दिव्यात अनधिकृत शाळांचा प्रश्न गंभीर आहे.मात्र यासाठी अधिवृत्त शाळा बंद ठेवून विद्यार्थ्यांचे नुकसान का करायचे ?अनधिकृत शाळा बंद होत नाहीत म्हणून अधिकृत शाळा बंद ठेवण्याचा निर्णय काही संस्था चालकांनी जाहीर केला होता. याला आता दिव्यातील सर्वसामान्य जनतेतून विरोध होताना दिसत आहे.जर विद्यार्थ्यांकडून फी घेऊन तुम्ही स्वतः:च्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवणार नसाल आणि अनधिकृत शाळा बंद व्हाव्यात म्हणून स्वतः:च्या शाळा बंद ठेवणार असाल तर यातून विद्यार्थ्यांचे कोणतेही साधले जाणार आहे ? असा प्रश्न आता प्रशांत गावडे यांनी यानिमित्ताने विचारला आहे.

# भाजपच्या सपना भगत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम संपन्न



**दिवा:-**भाजपच्या महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. यावेळी भाजप पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. भाजपा दिवा महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत यांच्या वाढदिवसानिमित्त युवा रोजगार मेळावा , मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि असंघटित कामगार कार्ड वाटप ,जेष्ठ नागरिक कार्ड वाटप, अधिवास प्रमाणपत्र (दस्म्मत) वाटप असे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.नागरिकांनी मोठ्या संख्येन उपस्थिती राहून या उपक्रमांचा लाभ घेऊन सौ सपना भगत यांना शुभेच्छा दिल्या .या कार्यक्रमाला भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर , गणेश भगत, धर्मेंद्र शेलार ,नितीन कोरगांवकर, रवि मुणंनकर ,विठ्ठल गावडे ,सातिश केळशीकर,जयदिप भोईर ,समीर चव्हाण , किरण कोरगांवकर,अशोक गुप्ता ,राहुल साहू ,गौरीशंकर पटवा ,जिलाजीत तिवारी,प्रफुल साळवी , उदय सावंत , स्वप्नील धुमाळ ,पंकज सिंग,विरेंद्र गुप्ता,विशाल गुप्ता,महिला मोर्चातील सौ सपना भगत यांच्या सर्व सहकारी आणि दिवा भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिवा शहरातील विद्यार्थ्यासाठी अभ्यासिका सुरू करणार- रमाकांत मढवी

## युवती सेनेतर्फे आयोजित गुणगौरव सोहळ्यात शहरप्रमुख रमाकांत मढवी यांचे आश्वासन


**दिवा:-** महाराष्ट्राचे यशस्वी माजी मुख्यमंत्री, विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व कायसम्राट,संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून व शिवसेना शहरप्रमुख माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली युवतीसेना शहराधिकारी कु साक्षी रमाकांत मढवी यांच्यावतीने दिवा शहरात दहावी व बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला दिवा शहरातील ५०० पेक्षा जास्त यशस्वी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी सांगितले की, शिवसेना दिवा शहर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे आणि त्यासाठीच शालेय विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण वर्षभर अनेक कार्यक्रम पक्षाच्या वतीने घेतले जातात, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षा घेतली जाते त्याला दिवा शहरातील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे मढवी यांनी सांगितले. दिवा शहरातून ९६ टक्के गुण मिळवण्प्रया तीन विद्यार्थ्यांना यावेळी विशेष सत्कार केला व या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी ५१०००/- रुपयांचे साह्य करण्यात आले. अशा गुणवंत विद्यार्थ्यांमुळे दिवा शहराचे नावलौकिक वाढत असून अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी दिवा शहरात लवकरच एक अभ्यासिका सुरु करणार असल्याचे मत रमाकांत मढवी यांनी व्यक्त केले. दिवा शहरात तरुण तरुणींसाठी नेहमीच नवनवीन उपक्रम राबवण्प्रया युवती सेना शहराधिकारी साक्षी मढवी हिचे शिवसेना उपशहरप्रमुख अँड आदेश भगत यांनी आपल्या भाषणातून कौतुक केले व दरवर्षी न चुकता असा मोठा गुणगौरव सोहळा आयोजित करण्प्रया या तरुण नेतृत्वाच्या खांद्याला खांदा लाऊन काम करण्याचे आव्हान यावेळी उपस्थित तरुणींना केले. या कार्यक्रमाला शिवसेना उपशहरप्रमुख शैलेश पाटील, गणेश मुंडे, अँड आदेश भगत, नगरसेवक दिपक जाधव, अमर पाटील, सौ दीपाली भगत, विभाग प्रमुख चरणदास म्हात्रे, उमेश भगत, शशिकांत पाटील, गुरुनाथ पाटील, राजेश पाटील, जगदीश भंडारी, सचिन चौबे, सौ अर्चना पाटील, सौ सरिता मढवी सौ सुविता मढवी,शिवसेना शाखाप्रमुख,महिला पदाधिकारी,कार्यकर्ते व विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना दिवा शहर आयोजित दहावी व बारावी यशस्वी विद्यार्थ्यांसाठी गुणगौरव सोहळा संपन्न



**दिवा:-** शिवसेना दिवा शहर आयोजित दहावी बारावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा दिव्यातील अवधूत हॉल येथे संपन्न झाला. युवती सेनेच्या साक्षी मढवी यांनी या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे आयोजन युवा शिवसेनेच्या शहर अधिकारी, युवती सेना, दिवा शहर, कु. साक्षी रमाकांत मढवी यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.सदर कार्यक्रम ग्लोबल शाळेसमोर दिवा आगासन रोड, अवधूत हॉल, येथे पार पडला. दिवा शहरातील दहावी व बारावी विद्यार्थी - विद्यार्थिनी यावेळी मोठ्या संख्येत उपस्थित होते. या कार्यक्रमाला मा. उपमहापौर रमाकांत मढवी, माजी नगरसेवक शैलेश पाटील, अमर पाटील,मा.नगरसेविका दिपाली भगत, दीपक जाधव, चरणदास म्हात्रे, गणेश मुंडे, आदेश भगत, अर्चना पाटील, उमेश भगत,सचिन चौबे, सर्व शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिव्यात शिवसेना ठाकरे गटाकडून हिंदी सक्तीच्या जीआर ची होळी



शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने दिवा येथे हिंदी सक्तीच्या जीआर विरोधात आंदोलन करण्यात आले व राज्य सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी हिंदी सक्तीच्या जीआरची होळी शिवसैनिकांच्या वतीने करण्यात आली. यावेळी शिवसेना कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे, विधानसभा संघटिका योगिता नाईक, दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, शाखाप्रमुख व शिवसैनिक उपस्थित होते.

# घोडबंदर रोड येथील संथ गती कामामुळे नागरिक हैराण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ठाणे काँग्रेसचे निषेध आंदोलन

**ठाणे :-** घोडबंदर रोड येथे एमएमआरडीए, महानगरपालिकेसह विविध यंत्रणांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत.सदरची विकासकामे अगदी संथ गतीने सुरू असल्यामुळे याचा मोठ्या प्रमाणात त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.प्रचंड वाहनांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर मेट्रो सह घोडबंदर सेवा रस्ता मुख्य रस्त्यात विलीनीकरणाचे काम, उड्डाण पूल व त्यावर पडलेले खड्डे,उघडी गटारे,विविध ठिकाणी केलेले खोदकाम यामुळे रस्त्याची दुरावस्था झाली असून वाहतूक कोंडी मुळे प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याने जनतेतून नाराजी व्यक्त होत आहे.याबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून ठाणे शहर काँग्रेस चे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली घोडबंदर रोड येथील आनंद नगर नाका येथे लक्षवेधी निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला माजी मंत्री आ.डॉ.जितेंद्र आव्हाड,धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांच्यासह विविध संघटनांनी उपस्थित रहात पाठिंबा दिला.या आंदोलनाबाबत मुख्यमंत्र्यांना द्यावयाचे निवेदन भारतीय जनता पक्षाचे आमदार निरंजन डावखरे यांनी आंदोलनस्थळी येऊन स्वीकारले तसेच आपल्या भावना मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवू असे आश्वासन देखील दिले.

यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की मेट्रो मार्गासाठी व कारशेडसाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादनामध्ये झालेला विलंब यामुळे कारशेडची निर्मिती नाही,ब्रयाच ठिकाणी मेट्रोचे पिलर्स उभारलेले नाही, मेट्रो स्टेशनचे अपूर्ण असलेली कामे, उभ्या केलेल्या पिलर्स वर न टाकलेले गर्डर, अशा अनेक अपूऱ्या व त्रुटींजन्य कामामुळे अनेक वर्षे रखडलेले मेट्रोचे काम नजीकच्या काळात देखील मार्गी लागणार नाही असे एकंदर परिस्थितीनुसार दिसून येते.तसेच गर्दीच्या वेळात बंदी असतानाही अवजड वाहनांना शहरात दिलेला प्रवेश, वाहतूक पोलीस व ट्राफिक वॉर्डन यांची




कमतरता,शहरातील चालू असलेली बेकायदा प्रवासी वाहतूक, ट्रक टर्मिनस बस डेपो यासारख्या सुविधांचा अभाव, कंत्राटदाराकडून होणारे अटी शर्तींचे उल्लंघन,महापालिका व एम.एम आर.डी.ए यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी तज्ञ अधिकाऱ्यांचा अभाव,या सर्व गोष्टी वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहेत व यामुळे मागील दहा ते पंधरा वर्षात अनेक लोकांना अपघातात आपले प्राण गमवावे लागले आहेत.वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने केलेले दुर्लक्ष व कामातील हलगर्जीपणा यामुळे ही कामे रखडली असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे.त्यामुळेच आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले असे सांगत प्रशासनाच्या भूमिकेचा तीव्र निषेध केला.

प्रशासकीय यंत्रणेने तातडीने त्यांच्या मागण्यांची दखल घेतल्यानंतर पाच तासानंतर निषेध आंदोलन मागे घेण्यात आले. परंतु आजच्या आंदोलनातूनही प्रशासनाने सकारात्मक पावले उचलून योग्य त्या उपाययोजना केल्या नाहीत तर आम्हाला उग्र आंदोलन छेडावे लागेल असा इशाराही ठाणे काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी दिला आहे. आंदोलनादरम्यान उपस्थित पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत रोष देखील व्यक्त केला.

या आंदोलनात ठाणे काँग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे यांच्यासह भालचंद्र महाडिक,राजेश जाधव,प्रदीप राव,रमेश इंदिसे,महेंद्र म्हात्रे,रवींद्र कोळी,उमेश कांबळे,निशिकांत कोळी,स्मिता वैती,संगीता कोटल,शीतल अहेर,शिल्पा सोनोने,हिंदुराव गळवे,अजिंक्य भोईर,स्वप्नील कोळी,उमेश सिंग,श्रीकांत गाडीलकर,अंजनी सिंग, निलेश पाटील,वसीम सय्यद,राजु शेट्टी,यासीन मोमिन,जयेश परमार, नुर्शिद शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते

# ठाणे मतदारसंघातील प्रत्येक कुटुंबाला महानगर गॅसजोडणी..

## मासुंदा, खारकर आळी, चरई भागात लवकरच कार्यान्वित
## आमदार संजय केळकर यांचा पुढाकार..

**ठाणे :-** जुन्या ठाणे शहराबरोबरच ढोकाळी, माजिवडा, कोलशेत, बाळकूम आदी परिसरात गेल्या तीन वर्षात ६५०० च्या वर घरांना महानगर गॅस जोडण्या आमदार संजय केळकर यांनी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे हजारो कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

स्वयंपाकासाठी घरगुती गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे नागरिकांचा कल वाहिन्यांद्वारे इमारतींमध्ये घरगुती गॅस पुरवणाऱ्या महानगर गॅस कंपनीकडे वाढू लागला आहे. मात्र वेळखाऊ आणि किचकट प्रक्रियेमुळे ही गॅस जोडणी मिळवताना नागरिकांच्या नाकी नऊ येत असतात. आमदार संजय केळकर यांनी नागरिकांची ही अडचण ओळखून ठाणे शहर मतदारसंघातील नागरिकांना महानगर गॅस जोडणी देण्याचा संकल्प तीन वर्षांपूर्वी केला. आणि पाहता पाहता त्यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने आतापर्यंत ६५००हून जास्त कुटुंबांना गॅस जोडणी मिळवून दिली आहे. यात जुन्या ठाणे शहराबरोबरच ढोकाळी, माजिवडा, कोलशेत, बाळकूम आदी परिसरातील हजारो कुटुंबांचा समावेश आहे. मतदारसंघातील प्रत्येक कुटुंबाला गॅस जोडणी मिळवून देण्याचा श्री.केळकर यांचा संकल्प आहे. मासुंदा, खारकर आळी, चरई, उथळसर आणि आसपासच्या भागात देखील ही जोडणी करण्यात आली असून लवकरच ती कार्यान्वित देखील होणार आहे. माजी नगरसेवक सुनेश जोशी, निलेश कोळी, रवी रेड्डी, निलेश पाटील, तन्मय भोईर, महापालिका आणि महानगर गॅस प्रतिनिधी यांच्या सहकार्याने ही मोहीम सध्या जोरात सुरू आहे. विशेष म्हणजे आमदार संजय केळकर हे या कामाचा सातत्याने पाठपुरावा करत असून दर १५ दिवसांनी रहिवासी, महानगर गॅसचे अधिकारी यांच्या एकत्रित बैठका घेत आहेत. त्यामुळे प्रलंबित समस्या मार्गी लागून गॅस जोडणीच्या कामाला वेग आला आहे.

# कळव्यात चारचाकी वाहनांवरती पडले झाड




**ठाणे :-** कळवा पारसिक नगर या ठिकाणी पार्क केलेल्या ०२ चारचाकी वाहनांवरती झाड पडल्याची घटना शुक्रवारी दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी, ज्या वाहनांवरती झाडे पडले त्या वाहनांचे नुकसान झाले आहे. कळवा पारसिक नगर परिसरात झाड पडल्याची माहिती राजू भिसे नामक व्यक्तीने ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षेचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. याघटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. पण ते झाड हर्षद पाटील आणि बसंतकुमार जोशी यांच्या मालकीच्या गाड्यांवर पडल्याने त्या चारचाकी गाड्यांचे किरकोळ नुकसान झाले आहे.तसेच पडलेले झाड आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने कापून बाजूला करण्यात आली आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

# घोडबंदर रोडवरील सिग्नल जवळ रम्बलर पट्ट्यांचा प्रायोगिक तत्त्वावर वापर होणार

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

**ठाणे :-** घोडबंदर रोडवरील पाच वाहतूक सिग्नलपाशी प्रायोगिक तत्त्वावर रम्बलर (वेग नियंत्रक पट्ट्या) लावण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास घोडबंदर रोडवरील सर्वच सिग्नलपाशी त्यांची अमलबजावणी करण्यात येणार आहे.

अपघात टाळण्यासाठी सिग्नलपाशी वाहनांचा वेग कमी करून अवजड वाहने नियंत्रित करण्याची आवश्यकता असल्याचे मत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी बैठकीत मांडले. या सूचनेचा अवलंब करण्यासाठी महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक पोलीस यांनी संयुक्तपणे पाच ठिकाणांची निवड करावी. तेथे प्रायोगिक तत्त्वावर ही व्यवस्था करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. हा प्रयोग करताना वाहन चालकांना दिसेल अशा पद्धतीने त्याचा इशारा देणारी पाटी, रिफ्लेक्टर्स आदी गोष्टी शास्त्रशुद्ध पद्धतीने कराव्यात. इंडियन रोड कॉंग्रेसने निर्धारित केलेल्या सर्व मार्गदर्शक नियमांचे पालन करावे, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

घोडबंदर रस्ता आणि परिसरातील नागरी कामांविषयी चर्चा करण्यासाठी जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींसोबत बैठकीचे आयोजन महापालिका आयुक्त कार्यालय येथे करण्यात आले होते. आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, नगर रचना सहाय्यक संचालक संग्राम कानडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, शुभांगी केसवानी, घोडबंदर रोडचे समन्वय अधिकारी आणि कार्यकारी अभियंता संजय कदम यांच्यासह एमएमआरडीए, मेट्रो यांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत, वाघबीळ येथील अंतर्गत रस्ता, भाईंदरपाडा आणि साईनगर येथील सेवा रस्त्याची दुरावस्था, रोझा गार्डिनिया येथील प्रस्तावित वाहतूक बेट आदी विषय प्रतिनिधींनी मांडले. त्यावर, कालबद्ध कार्यक्रम घेऊन पूर्तता करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी संबंधित विभागांना दिले.

तसेच, रस्त्यावरील राडा रोडा, वायरी, अनावश्यक बॅरिकेड्स आदी काढून टाकण्यासाठी महापालिका, सार्वजनिकबांधकाम विभाग, मेट्रो आणि एमएमआरडीए यांनी संयुक्तपणे सर्वंकष स्वच्छता मोहीम (डीप क्लिन ड्राईव्ह) घ्यावी, असेही आयुक्त राव यांनी सांगितले.

**घनकचरा समस्या, लोकसहभागाची आवश्यकता**

गायमुख आणि परिसरातील कचऱ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठीबहुपर्यायी उपाययोजना करण्याची आवश्यकता प्रतिनिधींनी व्यक्त केली. तसेच, काही मोठ्या गृहसंकुलांनी छोटेखानी कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू



जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींसोबत झाली बैठक

करण्याची तयारी दर्शवल्याचेही या प्रतिनिधींनी सांगितले. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी व्यापक लोकसहभागाची आवश्यकता असून त्यासाठी महापालिका प्रयत्न करीत आहे, असे आयुक्त राव यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच, ज्यागृहसंकुलांनी घनकचरा व्यवस्थापनात रस दाखवला आहे, त्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्याकडे बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**रिक्षा स्टॅण्डसाठी संयुक्त सर्वेक्षण**

ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व रिक्षा थांब्यांचे वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि महापालिका यांच्यामार्फत संयुक्त पाहणी करण्याचे या बैठकीत ठरले. रिक्षा थांब्यांच्या जागा निश्चित करून त्यांचे नियमन करण्यात येईल, असे पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी सांगितले.

# मिठी नदी गाळ गैरव्यवहारातील दोन कंपन्यांचा ठाण्यात शिरकाव

**घोडबंदर रोडवरील आनंदनगर ते माजिवडा रस्त्याच्या देखभाली करिता एमएमआरडीएचे तीन कोटींचे कंत्राट**

**मनसेच्या संदीप पाचंगे यांचा भ्रष्ट कंपन्यांना काम न देण्याचा इशारा**

**ठाणे :-** मुंबईतील मिठी नदी गाळ गैरव्यवहार करून मुंबई महापालिकेला लुटल्यानंतर भ्रष्ट ठेकेदार कंपन्यांची आता ठाण्याकडे वक्रदृष्टी पडली आहे. मिठी गैरव्यवहार प्रकरणातील पाच भ्रष्ट कंपन्यांना ठाणे महापालिकेमध्ये कोणतेही काम देऊ नये, अशी स्पष्ट मागणी मनविसेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांनी ठाणे महापालिकेकडे आधीच केली होती. तरीही, यातील दोन कंपन्यांनी एमएमआरडीए कडून घोडबंदर रोडवरील आनंदनगर ते माजिवडा रस्त्याच्या देखभालीचे तीन कोटीचे कंत्राटासाठी निविदे मध्ये सहभाग घेतला आहे. अशा लबाड कंपन्यांना कंत्राट बहाल केल्यास थेट न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशारा पाचंगे यांनी एमएमआरडीएला दिला आहे. मुंबई महापालिकेतील मिठी नदी गाळ प्रकरणातील ६५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची सध्या ईडीकडुन चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. या पाच भ्रष्ट ठेकेदार कंपन्यांपैकी एन.ए. कन्स्ट्रक्शन, आणि जे.आर.एस. इन्फ्रास्ट्रक्चर या दोन कंपन्यांनी आनंदनगर ते माजिवडा रस्त्याच्या देखभाली करिता ३ कोटीच्या निविदे मध्ये सहभाग घेतला आहे.

या भ्रष्ट कंपन्यांनी मिठी नदी गाळ उपसण्याच्या कामांमध्ये बनावट मोजमापे, खोटे दस्तावेज आणि चुकीचे बिलिंग यांसारख्या गंभीर त्रुटी कामात केल्या असून, संबंधित प्रकरणाची सध्या चौकशी सुरु आहे. तरी देखील एमएमआरडीए कडून ठाण्यातील महत्वाच्या रस्त्याच्या देखभाली करिता देण्यात येणारे ३ कोटीचे काम या कंपन्यांना पुन्हा देणे म्हणजे जनतेच्या कराच्या पैशांची उधळपट्टी ठरेल. मुंबई महापालिकेची फसवणूक करण्यारा या कंपन्यांच्या कामावर विश्वास ठेवणे धोकादायक आहे. याबाबत एमएमआरडीए प्रशासनाने कठोर पावले उचलून वेळीच भ्रष्टाचार रोखावा. या भ्रष्ट कंपन्यांना या कामात तसेच इतर कोणत्याही कामात सहभागी करून घेऊ नये. तसेच आपण संबंधित कंपन्याना काळ्या यादीत टाकावे. अन्यथा कायदेशीर कारवाई करिता न्यायालयात दाद मागावी लागेल, असा इशारा मनसेचे संदीप पाचंगे यांनी एमएमआरडीएचे कार्यकारी अभियंता राठोड यांना दिला आहे.

# 'सह्याद्री'वर झालेल्या निर्णयावर मोघरपाडा भूमिपुत्र ठाम.. आमदार संजय केळकर यांच्याकडे घेतली धाव.


**ठाणे:-** मोघरपाडा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी मेट्रो कारशेडसाठी संपादित करण्यात आल्याची घोषणा झाली असली तरी येथील बाधित शेतकरी दोन वर्षांपूर्वी मुंबईत सह्याद्री बंगल्यावर झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर ठाम आहेत. त्यानुसार पुनर्वसन व्हावे अशी मागणी करत सुमारे २५० भूमिपुत्रांनी आमदार संजय केळकर यांच्याकडे धाव घेत व्यथा मांडली. मेट्रो कारशेडचा प्रश्न अद्याप संपला नसल्याचे मोघरपाडा येथील बाधित १६७ भाडेपट्टेधारक आणि ३२ अतिक्रमणधारक शेतकऱ्यांच्या भूमिकेवरून स्पष्ट झाले आहे. एमएमआरडीएने कारशेडसाठी मोघरपाडा येथे एकूण १७४.०१ हेक्टर क्षेत्रफळ जमीन ताब्यात घेतली आहे. पट्टेधारक शेतकऱ्यांना त्यांच्या मूळ जमीनक्षेत्राच्या २२.५ टक्के भूखंड अतिक्रमणधारकांना त्यांच्या मूळ जमीनक्षेत्राच्या १२.५इ भूखंड देण्यात येणार असल्याचे प्राधिकरणाने जाहीर केले आहे. मात्र या निर्णयाशी बाधित शेतकरी सहमत नसून ते दोन वर्षांपूर्वी झालेल्या निर्णयावर ठाम आहेत. २०२२ साली मुंबईत सह्याद्री येथे झालेल्या बैठकीत बाधित शेतकऱ्यांना तेथील जमिनी कायमस्वरूपी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यावेळी अनेक निर्णय घेण्यात आले होते. त्यानुसारच मोबदला मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. मात्र भूसंपादन झाल्यानंतर शेतकरी हवालदिल झाले असून त्यांनी जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमात उपस्थित राहून आमदार संजय केळकर यांची भेट घेतली आणि आपली बाजू मांडली. आमचा विकासाला विरोध नाही पण पूर्वी जे निर्णय झाले त्याची अंमलबजावणी व्हावी अशी भूमिका मांडली. याबाबत बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले, भूमिपुत्रांना कायमस्वरूपी भूखंड देण्याचा निर्णय झाला होता. हे शेतकरी वर्षानुवर्षे जमीन कसत आहेत. त्यांना न्याय मिळावा यासाठी एमएमआरडीए, जिल्हाधिकारी आणि संबंधित प्राधिकरणांशी मी बोलत असून पुढील काळात या शेतकऱ्यांना न्याय मिळेल, असा विश्वास श्री.केळकर यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांची ठाणे महापालिकेस भेट



## महापालिका सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन, मूलभूत सुविधा तसेच इतर बाबींचा घेतला आढावा

**ठाणे :-** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रूक्कानसिंग डागोर यांनी आज ठाणे महापालिकेस भेट देवून महापालिकेच्या सफाई कर्मच्यांचे वेतन, मूलभूत सुविधा तसेच इतर बाबींचा सविस्तर आढावा घेतला. दरम्यान सफाई कर्मचारी हा सर्वात महत्वाचा घटक असून शहराचे सौंदर्य ठिकवून ठेवण्याचे काम ते सातत्याने करत असल्याने त्यांना देण्यात येण्या्या सेवा सुविधांचा लाभ प्राधान्याने देण्याच्या सूचना आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रूक्कानसिंग डागोर यांनी महापालिका प्रशासनास दिल्या. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रूक्कानसिंग डागोर यांनी आज महापालिकेच्या कै. अरविंद पेंडसे सभागृहात त्यांनी पालिका अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीस महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी.गोदेपुरे, उपाआयुक्त मनीष जोशी, अनघा कदम, वैद्यकीय अधिकारी डॉ प्रसाद पाटील, आरोग्य अधिकारी डॉ राणी शिंदे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप आदी अधिकाऱ्यांसह सफाई कामगारांच्या युनियनचे पदाधिकारी, कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. ठाणे महापालिकेच्यावतीने सफाई कामगारांसाठी निवारा, एकूण कार्यरत सफाई कर्मचारी, तात्पुरते सफाई कर्मचारी, त्यांची पदोन्नती, वेतन, आरोग्यविषयक सुविधा तसेच महापालिकेच्या घनकचरा व मलनि:सारण विभागांतर्गत मनुष्यबळ, रिक्त जागा, पदोन्नती, कर्मच्यांचे भत्ते, वारसा हक्काने देण्यात येण्या्या नियुक्त्या आदीबाबत उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, यांनी सविस्तर माहिती दिली. सफाई कर्मचारी हा महत्वाचा घटक असून शहर स्वच्छ ठेवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. त्यामुळे त्यांना देण्यात येण्या्या सेवा सुविधांचा लाभ प्राधान्याने देण्याच्या सूचना यांनी महापालिका प्रशासनास दिल्या. सफाई कर्मच्यांसाठी चेंजिंग रूम, वैद्यकीय सुविधा, पी एफ, नवीन भरती प्रक्रिया तसेच लाड-पागे धोरणानुसार वारसा हक्काची प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत. सफाई कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याची कार्यवाही ३० दिवसात करावी, तसेच सफाई कर्मच्यांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरीत सामावून घ्यावे. त्याचप्रमाणे सफाई कर्मच्यांना रूग्णालयात कॅशलेस सुविधा उपलब्ध होतील या दृष्टीने योजना तयार करावी. ठाणे महापालिकेत कंत्राटी पद्धतीने काम करण्या्या सफाई कर्मच्यांना देखील आरोग्यविषयक सर्व सुविधा द्याव्यात, कंत्राटी कर्मचा-यांना जर ठेकेदार पगार वेळेत देत नसेल तर त्या ठेकेदाराचा ठेका रद्द करुन त्याला काळ्या यादीत टाकावे तसेच महापालिका सेवेत २५ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मच्यांना मालकी हक्काची घरे मिळतील या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना शेरसिंग डागोर यांनी महापालिका प्रशासनास दिल्या. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून सफाई कर्मचात्यांसाठी उत्कृष्ट सफाई कर्मच्यांना प्रोत्साहित करणे, मासिक वेतन वेळेवर अदा करणे, सफाई कर्मच्यांना सेवानिवृत्तीनंतरचे फायदे हे सेवानिवृत्तीदिवशीचदिले जातात. सफाई कर्मच्यांना सुरक्षा साहित्य साधन दिली जातात, कर्मच्यांची आरोग्य तपासणी केली जाते तसेच महिला कर्मच्यांची मॅमोग्राफी तपासणी केली जाते या सुविधांबाबत महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले.



# रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नगरविकास विभागाच्या नियमावली मध्ये पार्किंग व्यवस्थेवर आधारित सुधारणा करणे आवश्यक

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई :-** रस्त्यावरील वाहतुकीला शिस्त लावून अनावश्यक वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महानगरामध्ये एकात्मिक पार्किंग व्यवस्था आणणे महत्त्वाचे असून त्या अनुषंगाने मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण प्रदेशात नगरविकास विभागाने आपल्या नियमावली मध्ये पार्किंग व्यवस्थेवर आधारित आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे! असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. ते या संदर्भात मंत्रालयात बोलावलेल्या ठ मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण ठ प्रदेशातील महापालिका आयुक्तांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी परिवहन विभागाचे अतिरिक्त सचिव संजय सेठी, नगरविकास विभागाचे अतिरिक्त सचिव असिम गुप्ता तसेच परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह मुंबई, ठाणे, नवी मुंबई, भिवंडी- निजामपुर, पनवेल, मीरा-भाईंदर, वसई विरार या महापालिकेचे आयुक्त उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले भविष्यात शहराच्या विकास आराखड्यात मध्ये महापालिकेने पार्किंग साठी विशेष जागा उपलब्ध करून देणे बंधनकारक ठरणार आहे. त्या अनुषंगाने नगरविकास विभागाने आपल्या नियमावली मध्ये बदल करून नवीन १४ सुचनांचा समावेश असलेला आराखडा मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण प्रदेशातील महापालिकांना पाठवावा.

यावेळी बोलताना नगर विकास खात्याचे अतिरिक्त सचिव असीम गुप्ता म्हणाले, भविष्यात रस्त्याच्या कडेला असलेल्या अवैध पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिकेने आपल्या मोकळ्या जागेवर पार्किंग व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे .तसेच खाजगी सोसायटी व जागा मालकांच्या पूर्व परवानगीने कार्यालयीन वेळेच्या पश्चात(रात्री १२-६) आधारित पार्किंग व्यवस्था निर्माण करण्यासाठी देखील महापालिकेने चाचपणी करणे आवश्यक आहे. याबरोबरच जे रस्ते रुंद आहेत, त्या रस्त्यावर वाहतूक कोंडी होणार नाही अशा प्रकारे महापालिकेने एक दिवस आड पार्किंग व्यवस्था निर्माण केली पाहिजे



.तसेचं पार्किंग व्यवस्था ही मनुष्य हस्तक्षेपा शिवाय होण्यासाठी फास्ट टॅग वर आधारित असल्यास लोकांना त्याचा सहज वापर करणे शक्य होईल.

याबरोबरच पार्किंगचे शुल्क हे अतिशय कमी ठेवावेत जेणेकरून लोकांना परवडेल आणि ते सहजगत्या उपलब्ध पार्किंग व्यवस्थेचा फायदा घेतील . अशी सूचना मंत्री सरनाईक यांनी यावेळी केली.

**भुमीअंतर्गत पार्किंग व्यवस्था निर्माण करा**

महानगरातील जागेची कमतरता लक्षात घेता उद्याने व बगीचा याच्या खाली भूमी अंतर्गत पार्किंग व्यवस्था निर्माण करावी, ठाणे शहरांमध्ये ठाणे महापालिकेने अशा प्रकारचा उपक्रम राबवला असून तो पथदर्शक असल्यामुळे इतर महापालिकेने देखील त्याचं अनुकरण करावे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.

# जुन्या ठाणे शहरातील रहिवाशांना तातडीने पाईप लाईनद्वारे घरगुती गॅस जोडणी द्या, अन्यथा कारवाईला सामोरे जा

## महानगर गॅस अधिकाऱ्यांना खासदार नरेश म्हस्के यांची तंबी

**ठाणे :-** ठाणे शहरातील नौपाडा, राम मारुती रोड, घंटाळी, भास्कर कॉलनी आणि आजूबाजूच्या परिसरातील अनेक गृहसंकुलांमध्ये अजूनही पाईप लाईनद्वारे घरगुती गॅस जोडणी झालेली नाही. जुने ठाणे अद्याप घरगुती गॅस जोडणी पासून वंचित आहे. आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रहिवासी आणि महानगर गॅस यांची संयुक्त बैठक घेत अधिकाऱ्यांची कानउघडणी केली. तसेच या रहिवाशांना तातडीने पाईप लाईनद्वारे घरगुती गॅस जोडणी करावी अशी तंबीच खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. जुन्या ठाण्यात घरगुती गॅस जोडणीची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. महानगर गॅस लिमिटेड या कंपनीकडे या संदर्भात मागणी करण्यात आली, अर्ज दिले, बैठकाही घेण्यात आल्या, परंतु अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. या भागातील नागरिकांना घरगुती गॅस ऐवजी सिलेंडरवर अवलंबून राहावे लागत आहे. या समस्येला वाचा फोडण्यासाठी आणि नागरिकांच्या मागण्या अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी शिवसेनेचे पदाधिकारी किरण नाकती, प्रकाश पायरे, बाळा गवस, संजीव कुलकर्णी यांनी पुढाकार घेतला. महानगर गॅस लिमिटेडच्या अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करण्यासाठी त्यांनी आज एक विशेष बैठक आयोजित केली. ही बैठक आनंद आश्रम येथे खासदार नरेश म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीत महानगर गॅसचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि विविध गृहसंकुलांचे पदाधिकारी उपस्थित होते. नागरिकांनी आपल्या तक्रारी अत्यंत स्पष्टपणे मांडल्या. काही ठिकाणी गॅस लाईनच पोहोचलेली नाही, तर काही ठिकाणी कनेक्शनसाठी मोठ्या प्रमाणात अडथळे येत आहेत, काही सोसायट्यांमध्ये सर्व प्रक्रिया पूर्ण करून देखील जोडणी झालेली नाही, अशा रहिवाशांनी तक्रारी केल्या. या बैठकीत शिवसेनेचे किरण नाकती आणि प्रकाश पायरे यांनी अनेक सोसायटी संदर्भात समस्या मांडल्या आणि महानगर गॅस प्रशासनासमोरील अडचणी समजावून सांगितल्या.

महानगर गॅस ही एकमेव सेवा पुरवठादार कंपनी असल्यामुळे नागरिकांना दुसऱ्या कोणत्याही पर्यायाकडे जाता येत नाही. म्हणूनच या कंपनीने जबाबदारीने काम करणे अत्यावश्यक आहे. तुम्ही सरकारी मान्यतेने सेवा देत आहात, पण नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणार असाल तर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी तंबीच खासदार नरेश म्हस्के यांनी अधिकाऱ्यांना दिली.

महानगर गॅस लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी प्रशांत कोठेगावकर यांनी तात्काळ गॅस जोडणी पूर्ण करुन कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी विलास जोशी, भास्कर पाटील, प्रीतम रजपूत, शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# सरकारी यंत्रणेच्या संगनमताने अनधिकृत शाळांचे पिक.. वीज आणि पाणीपुरवठा खंडित करण्याची आ. केळकर यांची मागणी

**ठाणे :-** ठाण्यात ८१ शाळा अनधिकृत असून त्यापैकी एकट्या दिव्यात ६५ शाळा आहेत. सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या या शाळांच्या चालकांवर एफआयआर दाखल करूनही या शाळा अद्याप सुरू आहेत. या शाळांना पाठीशी घालणारे झारीतील शुक्राचार्य कोण? असा प्रश्न करत संस्थाचालक आणि सरकारी यंत्रणेच्या संगनमतामुळेच या शाळा सुरू असल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी केला. यावेळी त्यांनी या शाळांचे वीज आणि पाणी खंडित करण्याची मागणी देखील केली.

ठाण्यात विशेषतः मुंब्रा आणि दिवा परिसरात अनधिकृत बांधकामांप्रमाणेच अनधिकृत शाळांचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. या शाळांवर ठोस कारवाई होत नसल्याने या शाळांचे शेपूट वाढतच चालले आहे. त्यामुळे सर्वसामान्य पालक आणि विद्यार्थ्यांची फसवणूक होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. शहरातील ८१ पैकी ६५ अनधिकृत शाळा दिवा परिसरात सुरु असल्याचा दावा अधिकृत शाळा संघटनेकडून केला जात आहे. शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच शिक्षण अधिकाऱ्यांनी अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे समायोजन अधिकृत शाळांमध्ये करण्यात यावे अशा सूचना करण्यात आल्या होत्या. मात्र या सूचनेकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. या सर्व शाळांना सर्व प्रकारच्या सुविधा मिळत असल्याने या शाळा सुरु असून हे सर्व सरकारी यंत्रणांच्या संगनमताने सुरु असल्याचा आरोप आमदार केळकर यांनी केला आहे.

शिक्षण विभागाच्या वतीने अनधिकृत शाळांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले, मात्र गुन्हे दाखल होऊनही एकाही संस्थाचालकाला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. अधिकृत शाळांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यांदर्भात आमदार संजय केळकर यांची नुकतीच भेट घेतली. त्यावेळी श्री. केळकर यांनी पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याशी चर्चा करून कठोर कारवाईची मागणी केली. तर श्री.डुंबरे यांनी कारवाईबाबतचा आढावा घेणार असल्याची माहिती श्री. केळकर यांनी दिली.